# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 15/04/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. खापा :— अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा मंगलाबार समोर खापा येथे दि. 13/04/2021 चे 16.00 वा. ते दि. 14/04/2021 चे 08.00 वा. फिर्यादी नामे— यशवंत सदाशिव कोबांडे वय 63 वर्ष रा. प्लॉट नं. 406 कुकडे ले—आऊट नागपुर यांचे शेतातील घराचे दाराचा अज्ञात आरोपीने कुलुप लावलेला कोंडा काढुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरामधुन गवत कापण्याची कटर मशिन किं. 12,000/—रू. तसेच स्वयंपाकाचे भांडे, धान्य व कागदपत्राची बॅग असा एकुण किंमती 14,000/—रू. चा मद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजय बारई पो.स्टे. खापा 9822289572 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील मौजा घोगली शिवार बोंडे आश्रम शाळेजवळ येथे दिनांक 09/04/2021 चे 09:30 वा. दरम्यान एमएच— 40/बीपी— 3654 क्रमांकाच्या पल्सर मोटारसायकलचा चालक आरोपी नामे— वैभव ढोके, रा. सोनेगाव याने त्याचे ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रस्त्याने पायदळ जाणारे इसम नामे— गोंविदराव चिरकुटराव हेलोंडे(मृतक), वय 74 वर्ष, खापरी (कोटे) ता कळमेश्वर यांना धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला व मानेला गंभीर दुखापत झाल्याने उपचाराकामी त्यांना मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि 13/04/2021 रोजी पहाटे 03.30 वा. मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विलास सचिन गोंविदराव हेलोंडे वय 31 वर्ष रा खापरी (कोटे) ता कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ वानखेडे 9850492065 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील मौजा उदासा येथे दिनांक 14/04/2021 चे 01:00 वा. ते 01:30 वा. दरम्यान अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच— 49/आयटी— 9212 क्रमांकाच्या मोटरसायकला समोरून जबर धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे— मोहम्मद अफजल मोहम्मद (मृतक) वय 32 वर्ष रा. मोमीनपुरा, नागपूर याला जागीच ठार होण्यास आरोपी वाहन चालक कारणीभुत झाला व आरोपी घटनास्थ्ळावरून पोलीसांना माहीती न देता पळुन गेला.

सदर प्रकरणी पोहवा अजितसिंह ठाकुर पो स्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राजु अडोर्लीकर 7588237764 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर